पुनर्वसित भागासाठी तयार केलेल्या नागरी सुविधांचे जिल्हा परिषदेकडे हस्तांतरण.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक - २६१०/प्र.क्र.१९०/परा-४,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक:- २३ नोव्हेंबर, २०१०**
**परिपत्रक**

पाटबंधारे प्रकल्पांमुळे प्रकल्प पुनर्वसितांना त्यांच्या मूळ ठिकाणापासून हलवून त्यांना एखाद्या ग्रामपंचायतीच्या हद्दीतील महसूली गावांच्या ठिकाणी पुनर्वसन करण्यांत येते. या पुनर्वसित ग्रामंपचायतीच्या संदर्भात मा. मंत्री, ग्राम विकास यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०/१०/२०१० रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत बऱ्याच पुनर्वसित गावठाणांतील नागरी सुविधांचे अद्याप जिल्हा परिषदेकडे हस्तांतरण झालेले नसलयाचे दिसून आले आहे. या संदर्भात मोहिम हाती घेणे आवश्यक असून यासाठी जिल्हास्तरावर नागरी सुविधांचे हस्तांतरण तातडीने होण्यासाठी संयुक्त समिती गठीत करण्याचे ठरविण्यात आले.

**शासन परिपत्रक:-**

शासनाने नागरी सुविधांचे जिल्हा परिषदेकडे हस्तांतरण करण्यारांदर्भातील मोहिमेत या बाबींशी संबंधीत असणाऱ्या अधिकाऱ्यांची एक जिल्हास्तरीय संयुक्त समिती गठीत केली असून या समितीमध्ये खालील सदस्य रहातील.

१. संबंधीत पाटबंधारे प्रकल्पाचे प्रभारी अधिकारी.
२. जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
३. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नियुक्त केलेले अधिकारी,
४. ज्या तालुक्यातील ग्रामपंचायतीचे सोयीसुविधाचे तपासणी करावयाची आहे अशा तालुक्याचे गट
   विकास अधिकारी,
५. प्रकल्पग्रस्तांचे दोन प्रतिनिधी.

या समितीने प्रत्यक्ष पुनर्वसित गावांच्या ठिकाणी जाऊन तेथे पाटबंधारे विभागामार्फत पुरविण्यात आलेल्या नागरी सुविधांची व त्यांच्या दर्जाची तपासणी करावी. पुनर्वसित ग्रामपंचायतीसाठी १८ नागरी सुविधा शासनाने मान्य केलेल्या आहेत. या सर्व सुविधा पुरविणे बंधनकारक आहे. नागरी सुविधांच्या हस्तांतरणासाठी या १८ सुविधांपैकी किमान १४ नागरी सुविधा पूर्ण केलेल्या असणे आवश्यक असून त्यामध्ये प्रामुख्याने पुनर्वसित गावठाणाला नळ पाणी पुरवठा योजना, ग्रामपंचायत कार्यालय, शैक्षणिक सुविधा, गावठाणा अंतर्गत रस्त्यासह गावठाणापर्यंत असणारा डांबरी पोहोच रस्ता, पथदिव्यांसह गावठाणात तीन फेज वीज जोडणी, दहनभुमी व त्यानुषंगिक सुविधा, गटारे, शौचकुप, आरोग्य सुविधा, गावठाणाच्या भावी विस्तारासाठी जमिन इत्यादी सुविधांचा समावेश असणे आवश्यक आहे. गावठाणाला पुरविण्यात आलेल्या नागरी सुविधांचा दर्जा संयुक्त समितीने तपासावा. या सुविधांचा दर्जा समाधानकारक असल्यास नागरी सुविधांचे हस्तांतरण जिल्हा परिषदेकडे करण्यात यावे. संयुक्त समितीस नागरी सुविधांबाबतच्या

